# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१०४५/८/९/५१
ई-मेल: iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
Ganeshkhind, Pune – 411007
Contact No.: 020-25621045/8/9/51
E-mail: iqac@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


अंगुहक/२०२६/७०१ दिनांक : ०१/०९/२०२६

## परिपत्रक

**प्रति,**

**मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख**
**सर्व संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये,**
**मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग,**
प्रस्तुत विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७

**विषय : संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभागस्तरीय “आविष्कार” संशोधन स्पर्धा २०२६–२७ आयोजित करणेबाबत....**

महोदय / महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गेल्या **१८ वर्षांमध्ये “आविष्कार” राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेत उल्लेखनीय व अभिमानास्पद यश** संपादन केले आहे. या यशाची परंपरा अधिक दृढ करण्याबरोबरच, शैक्षणिक वर्ष **२०२६–२७** मधील “आविष्कार” संशोधन स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये **संशोधन व नवोपक्रमाची संस्कृती अधिक बळकट करण्याचा मानस** मा. कुलगुरू महोदयांनी व्यक्त केला आहे.

या अनुषंगाने मा. कुलगुरू महोदयांनी **मा. प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे** यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीने सदर उपक्रमाच्या विविध बाबींचा सखोल विचार करून “आविष्कार” संशोधन स्पर्धेची सुधारित कार्यपद्धती निश्चित केली आहे.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष **२०२६–२७** मधील **“आविष्कार” संशोधन स्पर्धेचे आयोजन संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांनी खालीलप्रमाणे करावे.

## १. आविष्कार मार्गदर्शन शिबिर / कार्यशाळा

सर्व **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांनी **शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६** पर्यंत "आविष्कार" संशोधन स्पर्धेसंदर्भात **मार्गदर्शन शिबिर / कार्यशाळा** आयोजित करावी.

सदर मार्गदर्शन शिबिर / कार्यशाळेचा **सविस्तर अहवाल Geotagged Photographs सहित PDF स्वरूपात** तयार करून **शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६** पर्यंत पुढील **Google Link** **https://forms.gle/wkWXzM17NmseRX358** द्वारे सादर करावा.

## २. "आविष्कार" संशोधन स्पर्धेचे आयोजन

सर्व **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांनी **शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६** पर्यंत आपल्या स्तरावर "आविष्कार" संशोधन स्पर्धेचे आयोजन करावे.

स्पर्धा आयोजित केल्यानंतर पुढील स्तरासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची / प्रकल्पांची खालील माहिती तयार ठेवावी

**१. दोन Geotagged Photographs – At a Glance**
**२. एक Video Clip – १ मिनिट – At a Glance**
**३. १ मीटर × १ मीटर आकाराचा Poster** – केवळ निवड झालेल्या स्पर्धकांचा.
४. प्रत्येक यशस्वी सहभागी विद्यार्थ्याचा **१०० शब्दांचा Abstract, Times New Roman किंवा Unicode** फॉन्टमध्ये

**५. विद्यार्थी संख्येबाबत पात्रता :**

**संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभागस्तरीय "आविष्कार" संशोधन स्पर्धेपासून विभागीय स्तरावरील (Zonal Level) स्पर्धेपर्यंत प्रत्येक प्रकल्पासाठी जास्तीत जास्त २ विद्यार्थी सहभागी होण्यास पात्र असतील. त्यानंतर विद्यापीठ स्तरावरील "आविष्कार" संशोधन स्पर्धा व त्यापुढील स्तरासाठी प्रत्येक प्रकल्पातून केवळ १ विद्यार्थी पात्र राहील. सदर पात्रता व विद्यार्थी संख्येचे काटेकोरपणे पालन होईल याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख तसेच संशोधन समन्वयक यांची राहील.**

वरील माहिती विद्यापीठाच्या **अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाकडे (IQAC) शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६** पर्यंत पुढील **Google Link** **https://forms.gle/wkWXzM17NmseRX358** द्वारे ऑनलाइन पद्धतीने सादर करावी.

## ३. "आविष्कार" संशोधन स्पर्धेच्या पोस्टरचे प्रसिद्धीकरण व विद्यार्थ्यांना माहिती देणे

विद्यापीठाच्या **अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत (IQAC)** ई-मेलद्वारे प्राप्त होणारे **"आविष्कार" संशोधन स्पर्धा २०२६–२७ चे अधिकृत माहितीपत्रक / पोस्टर** संबंधित **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांनी आपल्या संस्थेतील **दर्शनी / सूचना फलकावर (Notice Board) ठळकपणे प्रदर्शित करावे.**

तसेच सदर माहिती **विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन**, विद्यार्थ्यांना "आविष्कार" संशोधन स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी **आवश्यक माहिती, मार्गदर्शन व प्रोत्साहन** देण्यात यावे.

विशेषतः संबंधित **विभागप्रमुख, प्राध्यापक, संशोधन समन्वयक (Academic & Research Co-Ordinator)** यांनी सदर पोस्टरची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, जेणेकरून अधिकाधिक पात्र व गुणवंत विद्यार्थ्यांना "आविष्कार" संशोधन स्पर्धेत सहभागी होता येईल.

## ५. अहवाल सादरीकरण व मानधन

मार्गदर्शन शिबिर / कार्यशाळा तसेच "आविष्कार" संशोधन स्पर्धा आयोजित केल्याचा **सविस्तर अहवाल Geotagged Photographs सहित PDF स्वरूपात शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६** पर्यंत पुढील **Google Link** **https://forms.gle/wkWXzM17NmseRX358** द्वारे सादर करणे आवश्यक राहील.

विहित मुदतीत आवश्यक माहिती व अहवाल सादर करणाऱ्या प्रत्येक **संलग्न महाविद्यालयास / स्वायत्त महाविद्यालयास / मान्यताप्राप्त परिसंस्थेस / विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागास रु. ७,०००/- (रुपये सात हजार फक्त)** इतके मानधन विद्यापीठाच्या नियमानुसार अदा करण्यात येईल.

सदर **रु. ७,०००/- मानधन संबंधित संलग्न महाविद्यालय / स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या विद्यापीठाकडे नोंदणीकृत व अधिकृत बँक खात्यावर ऑनलाइन माध्यमातून** अदा करण्यात येईल.

सदर मानधन **"आविष्कार" संशोधन स्पर्धेच्या संपूर्ण प्रक्रियेत केलेल्या समन्वय, मार्गदर्शन, नियोजन व सक्रिय योगदानाच्या अनुषंगाने, राज्यस्तरीय "आविष्कार" संशोधन स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर**, विद्यापीठाच्या नियमानुसार अदा करण्यात येईल.

सदर मानधन अदा करण्यासाठी संबंधित संस्थेने विद्यापीठाकडे अधिकृत बँक खात्याची आवश्यक माहिती विहित पद्धतीने नोंदविलेली असणे आवश्यक राहील.

## ६. संशोधन समन्वयकाची नियुक्ती

सर्व **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांनी प्रत्येकाने एका अनुभवी प्राध्यापकाची **"संशोधन समन्वयक ARC (Academic & Research Co-Ordinator)"** म्हणून नियुक्ती करावी.

सदर संशोधन समन्वयकाची नियुक्ती व नोंदणी संबंधित संस्थेमार्फत विद्यापीठाकडे **विहित पद्धतीने** करणे आवश्यक आहे. संशोधन समन्वयक हा "आविष्कार" संशोधन स्पर्धेच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये संबंधित संस्था / विभाग आणि विद्यापीठाचा **अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC)** यांच्यामधील प्रमुख समन्वयक म्हणून कार्य करेल.

**संशोधन समन्वयकाच्या प्रमुख जबाबदाऱ्या**

१. विद्यार्थ्यांना संशोधनविषयक मार्गदर्शन करणे.
२. संशोधन प्रकल्पांची निवड, संकल्पना व तयारी यामध्ये समन्वय साधणे.
३. विद्यार्थ्यांच्या सहभागाचे नियोजन व समन्वय करणे.
४. संबंधित संस्थास्तरीय / विभागस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी आवश्यक समन्वय साधणे.
५. आवश्यक माहिती, कागदपत्रे, Abstract, Photographs, Video Clips इत्यादी विहित मुदतीत सादर करणे.
६. विद्यापीठाच्या IQAC सोबत आवश्यक पत्रव्यवहार व समन्वय साधणे.
७. विभागीय / **Zonal Level** तसेच पुढील स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करणे.
८. "आविष्कार" संशोधन स्पर्धेच्या संपूर्ण प्रक्रियेचे वेळापत्रकानुसार प्रभावीपणे समन्वयन करणे.

संबंधित **मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख तसेच संशोधन समन्वयक** यांच्या सक्रिय सहभागातून विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती वाढवून **संशोधन व नवोपक्रमाची संस्कृती बळकट करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न** आहे.

## संशोधन समन्वयकासाठी मानधन

"आविष्कार" संशोधन स्पर्धा २०२६–२७ मध्ये सहभागी होणाऱ्या संस्थांनी नियुक्त केलेल्या संशोधन समन्वयकास **रु. ३,०००/- (रुपये तीन हजार फक्त)** इतके मानधन विद्यापीठाच्या नियमानुसार अदा करण्यात येईल. सदर मानधन हे संशोधन समन्वयकाने "आविष्कार" संशोधन स्पर्धेच्या संपूर्ण प्रक्रियेत केलेल्या **समन्वय, मार्गदर्शन, नियोजन व सक्रिय योगदानाच्या अनुषंगाने** देण्यात येईल.

### मानधन अदा करण्याच्या अटी

१. संबंधित संशोधन समन्वयकाची नियुक्ती संबंधित संस्थेमार्फत विद्यापीठाकडे विहित पद्धतीने नोंदणीकृत असणे आवश्यक राहील.

२. संबंधित संशोधन समन्वयकाने "आविष्कार" संशोधन स्पर्धेच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग व आवश्यक समन्वय केलेला असणे आवश्यक राहील.

३. संबंधित संस्थेने आविष्कार स्पर्धेसंदर्भातील आवश्यक माहिती, कागदपत्रे व अहवाल विहित मुदतीत सादर केलेले असणे आवश्यक राहील.

४. संशोधन समन्वयकास देय असलेले **रु. ३,०००/- मानधन राज्यस्तरीय "आविष्कार" संशोधन स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर**, विद्यापीठाच्या नियमानुसार अदा करण्यात येईल.

५. सदर मानधन **संबंधित संशोधन समन्वयकाने विद्यापीठाकडे विहित पद्धतीने नोंदविलेल्या व अधिकृत केलेल्या बँक खात्यावर ऑनलाइन माध्यमातून** अदा करण्यात येईल.

६. मानधन अदा करण्यासाठी संबंधित संशोधन समन्वयकाने आपल्या **अधिकृत बँक खात्याची आवश्यक माहिती विद्यापीठाकडे विहित पद्धतीने नोंदविलेली असणे** आवश्यक राहील.

## ७. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

विद्यार्थ्यांचे यश हे संबंधित **मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख तसेच संशोधन समन्वयक** यांच्या सक्रिय सहभाग व सहकार्यावर अवलंबून आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना "आविष्कार" संशोधन स्पर्धेसाठी प्रोत्साहित करण्याची जबाबदारी संबंधित **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांच्यावर सोपविण्यात येत आहे.

मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांनी आपल्या संस्थेत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करून त्यांना संशोधन, नवोपक्रम व "आविष्कार" स्पर्धेसाठी आवश्यक मार्गदर्शन व प्रोत्साहन द्यावे.

- **पदवीपूर्व (UG) स्तरावर प्रत्येक संशोधन श्रेणी / शाखेतून प्रत्येकी ३ प्रकल्प / संघांची निवड करावी.**
- **पदव्युत्तर (PG) स्तरावर प्रत्येक संशोधन श्रेणी / शाखेतून प्रत्येकी ३ प्रकल्प / संघांची निवड करावी.**
- **पदव्युत्तरोत्तर (PPG) स्तरावर प्रत्येक संशोधन श्रेणी / शाखेतून प्रत्येकी २ प्रकल्प / संघांची निवड करावी.**

निवड झालेल्या प्रकल्पांची / संघांची माहिती **अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC)** यांच्याकडे **शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६** पर्यंत पुढील **Google Link** **https://forms.gle/wkWXzM17NmseRX358** द्वारे ऑनलाइन नोंदणी करावी.

प्रत्येक निवड झालेल्या प्रकल्पास संबंधित **महाविद्यालय / परिसंस्था / विभागाने Subject/Poster Code** देणे आवश्यक राहील. सदर Code पुढील स्तरावरील नोंदणी, सादरीकरण व मूल्यांकन प्रक्रियेसाठी वापरण्यात येईल.

## ८. प्रथम स्तरावरील “आविष्कार” संशोधन स्पर्धा

प्रतिभावंत विद्यार्थ्यांना “आविष्कार” संशोधन स्पर्धेत सहभागी करून घेण्यासाठी **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांनी आपल्या स्तरावर **प्रथम स्तरावरील “आविष्कार” संशोधन स्पर्धेचे आयोजन** करावे. यासाठी संबंधित संस्थेतील विभागप्रमुख व प्राध्यापकांनी विषयतज्ज्ञ म्हणून कार्य करावे.

प्रथम स्तरावरील स्पर्धेतून प्रत्येक संस्थेने **प्रत्येक स्तरातून / प्रत्येक शाखेतून प्रत्येकी ३ प्रकल्प / संघांची निवड** करून विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाकडे **शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६** पर्यंत पुढील **Google Link** **https://forms.gle/wkWXzM17NmseRX358** द्वारे ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करावी.

## ९. “आविष्कार”च्या संशोधन श्रेणी

| अ. क्र. | संशोधन श्रेणी | UG | PG | PPG |
|---|---|---|---|---|
| १. | मानववंश, भाषा व ललित कला / Humanities, Languages and Fine Arts | ✓ | ✓ | ✓ |
| २. | वाणिज्य, व्यवस्थापन व विधी / Commerce, Management and Law | ✓ | ✓ | ✓ |
| ३. | विज्ञानशाखा / Pure Sciences | ✓ | ✓ | ✓ |
| ४. | कृषी व पशुसंवर्धन / Agriculture and Animal Husbandry | ✓ | ✓ | ✓ |
| ५. | अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / Engineering and Technology | ✓ | ✓ | ✓ |
| ६. | औषध व औषधनिर्माणशास्त्र / Medicine and Pharmacy | ✓ | ✓ | ✓ |

तज्ज्ञांकडून सदर संकल्पनांची तपासणी करून प्रथम टप्प्यात प्रस्तावांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या प्रस्तावांचे विभागीय स्तरावर सादरीकरण करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना मा. तज्ज्ञांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात येईल.

## १०.विभागीय स्तरावरील (Zonal Level) स्पर्धा

विद्यापीठाच्या वतीने विभागीय स्तरावरील (**Zonal Level**) “आविष्कार” संशोधन स्पर्धेचे आयोजन **ऑक्टोबर २०२६** मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे. विभागीय स्तरावर निवड झालेल्या संशोधन स्पर्धकांसाठी कार्यशाळा आयोजित करून त्यांच्या संशोधन संकल्पनांना अंतिम स्पर्धेच्या दृष्टीने योग्य स्वरूप देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येईल.

## ११.सहभागी विद्यार्थ्यांसाठी पात्रता नियम

### आविष्कारच्या श्रेणी / विषय

विद्यापीठातील विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या अभ्यासक्रमाच्या / शाखेच्या कोणत्याही बंधनाशिवाय त्यांच्या संशोधन कार्याच्या विषयानुसार खालीलपैकी कोणत्याही श्रेणीमध्ये सहभागी होता येईल :

**१. मानववंश, भाषा व ललित कला / Humanities, Languages and Fine Arts**
**२. वाणिज्य, व्यवस्थापन व विधी / Commerce, Management and Law**
**३. विज्ञानशाखा / Pure Sciences**
**४. कृषी व पशुसंवर्धन / Agriculture and Animal Husbandry**
**५. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / Engineering and Technology**
**६. औषध व औषधनिर्माणशास्त्र / Medicine and Pharmacy**

### अ) सर्वसाधारण पात्रता

SPPU च्या विभागांमध्ये किंवा विद्यापीठाच्या घटक / **संलग्न महाविद्यालयांमध्ये / स्वायत्त महाविद्यालयांमध्ये / SPPU मान्यताप्राप्त संस्थांमध्ये / विद्यापीठाचे शैक्षणिक विभागामध्ये** UG, PG किंवा PPG पदवीसाठी प्रवेश घेतलेले **केवळ नियमित व पूर्णवेळ विद्यार्थी** सहभागी होण्यासाठी पात्र असतील.

### ब) शाखेची अट

कोणत्याही स्तरावरील / कोणत्याही शाखेतील विद्यार्थी त्यांच्या संशोधन कार्याच्या विषयानुसार वरील सहापैकी कोणत्याही विषयश्रेणीमध्ये सहभागी होऊ शकतो.

### क) पदवीपूर्व विद्यार्थी / Undergraduate Students (UG)

SPPU चे विभाग किंवा त्यांचे घटक / **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये** शिक्षण घेणारे आणि **२५ वर्षांपेक्षा कमी वयाचे** विद्यार्थी पात्र असतील.

### ड) पदव्युत्तर विद्यार्थी / Post-graduate Students (PG)

SPPU चे विभाग किंवा त्यांचे घटक / **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये** शिक्षण घेणारे आणि **३० वर्षांपेक्षा कमी वयाचे** विद्यार्थी पात्र असतील.

### इ) पदव्युत्तरोत्तर विद्यार्थी / Post-PG Students (PPG)

SPPU चे विभाग किंवा त्यांचे घटक / **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये** पुढीलपैकी अभ्यासक्रमासाठी नोंदणी केलेली कोणतीही व्यक्ती पात्र असेल:

१. Ph.D. पदवीसाठी नोंदणीकृत विद्यार्थी.

**PPG विद्यार्थ्यांसाठी वयोमर्यादा लागू राहणार नाही.**

## १०. पात्रतेसाठी वयाची गणना

सहभागीच्या पात्रतेचे वय निश्चित करण्यासाठी ज्या शैक्षणिक वर्षात संशोधन अधिवेशन आयोजित केले जाते ते शैक्षणिक वर्ष विचारात घेतले जाईल. सहभागी विद्यार्थ्याचा निकाल घोषित झाला आहे किंवा नाही, याचा पात्रतेवर परिणाम होणार नाही. उदाहरणार्थ, आविष्कारच्या संबंधित आयोजन वर्षाच्या **३१ डिसेंबर रोजी किंवा त्यापूर्वी विद्यार्थी २५ वर्षांचा होत असेल**, आणि त्याचा निकाल पुढील वर्षाच्या जानेवारी ते जुलैदरम्यान घोषित होणार असेल, तर तो विद्यार्थी पात्र मानला जाईल. सामान्यतः निकालाचा कालावधी चालू वर्षाच्या जून / जुलैपासून पुढील वर्षाच्या १२ कॅलेंडर महिन्यांपर्यंत विचारात घेतला जाईल.

## ११. महाविद्यालय / संस्थास्तरीय / विभागस्तरीय मार्गदर्शक तत्त्वे

१. सहभागी विद्यार्थ्याच्या पोस्टरचा आकार **फक्त १ मीटर** × **१ मीटर** असावा.

२. पोस्टरवर सहभागी विद्यार्थ्यांचे नाव नमूद करू नये.

३. मार्गदर्शक / मेंटरचे नाव पोस्टरवर नमूद करू नये.

४. महाविद्यालय / परिसंस्था / विद्यापीठाचा शैक्षणिक विभाग यांचे नाव पोस्टरवर नमूद करू नये.

५. **महाविद्यालय / परिसंस्था / विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामार्फत देण्यात आलेला Subject / Poster Code पोस्टरवर स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील.**

६. केवळ निवड झालेल्या प्रवेशिका पुढील **विभागीय स्तरासाठी (Zonal Level)** पाठवाव्यात.

७. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

## १२. पोस्टर मूल्यांकनासाठी मार्गदर्शक तत्त्वे

संबंधित विषयातील **दोन परीक्षकांनी** प्रत्येक पोस्टरचे स्वतंत्रपणे मूल्यांकन करावे. परीक्षकांचा स्पर्धेतील कोणत्याही सहभागीशी कोणताही वैयक्तिक / शैक्षणिक संबंध नसावा.

**मूल्यांकन निकष**

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | कमाल गुण |
|---|---|---|
| अ | विषय / प्रकल्पाची उपयुक्तता (Relevance of Topic/Project) | २० |
| ब | अवलंबिलेली कार्यपद्धती (Methodology) | २० |
| क | योगदान / परिश्रम / प्रयत्न (Contribution / Hard Work / Efforts) | २० |
| ड | नावीन्य / अभिनवता / नवीनता (Innovativeness / Novelty / Newness) | २० |
| इ | प्रकल्पाचा निष्कर्ष / परिणाम (Outcome) | २० |
| | **एकूण** | **१००** |

कार्यपद्धतीच्या मूल्यांकनामध्ये **स्थानिक साहित्याचा वापर, आर्थिकदृष्ट्या किफायतशीर पद्धती / तंत्रज्ञान** इत्यादी बाबींचा विचार करण्यात यावा.

**मूल्यांकन पत्रक**

| अ. क्र. | पोस्टर क्र. | विषयाची उपयुक्तता (२०) | कार्यपद्धती (२०) | योगदान (२०) | नावीन्य (२०) | निष्कर्ष / परिणाम (२०) | एकूण (१००) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

## १३. महत्त्वाच्या सूचना

सर्व **संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग** यांनी वरील सर्व बाबींची **विहित मुदतीत पूर्तता करणे बंधनकारक** राहील.

"आविष्कार" संशोधन स्पर्धेच्या प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन, प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित **मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख तसेच संशोधन समन्वयक** यांनी सक्रियपणे कार्य करावे.

विद्यापीठाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना, मार्गदर्शक तत्त्वे व वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, **संलग्न महाविद्यालय / स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागास देय असलेले रु. ७,०००/- मानधन तसेच संशोधन समन्वयकास देय असलेले रु. ३,०००/- मानधन हे विद्यापीठाच्या नियमानुसार संबंधित अधिकृत व नोंदणीकृत बँक खात्यावर ऑनलाइन माध्यमातून अदा करण्यात येईल.**

सदर संशोधन स्पर्धा यासोबत जोडलेल्या **"आविष्कार" मार्गदर्शक नियम व तत्त्वांनुसार** आयोजित करण्यात यावी, ही विनंती.



**मा. प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे**
**अध्यक्ष, आविष्कार संशोधन समिती**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७



**प्रा. डॉ. विनायक जोशी**
**संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७